शपथेवर पुढील सरतपास श्री खेळकर विधीज्ञ मार्फत अर्जदारातर्फे :–

०९. शपथपत्र नि.क्र.यु–१० मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझया सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल प्रभारी व्यवस्थापक आस्थापना व व्यवस्थापन चंद्रपुर जि. मध्यवर्ती सह. बॅक यांनी मला दिलेला सेवा निवृत्तीच्या आदेशाची मुळ प्रतिवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यास नि.क्र.यु–१३ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी गैरअर्जदार बॅकेला दि.२३.०८.२०१९ रोजी निवृत्ती तारखेपर्यंत शाखेत सेवा करण्याबाबत ची माझी स्थळ प्रत दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र.यु–१४ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सह.बॅक मर्या चंद्रपुर यांना दि.०१.११.२०१९ रोजी सेवा निवृत्ती तारखेपुर्वी शिल्लक रजा उपभोगण्याबाबतची मी दिलेल्या पत्राची माझी स्थळ प्रत दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र.यु–१५ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब प्रमुख कार्यालय, चंद्रपुर यांना दि.२४.०२.२०२० रोजी निवृती तारखेपर्यंत कार्यरत पदावर सेवा करण्याची संमती मिळण्याबात दिलेल्या पत्राची माझी स्थळ प्रत दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क.यु–१६ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपुर जि. मध्यवती सह. बॅक मर्या प्र. कार्यालय, चंद्रपुर यांना दि.१३.११.२०२० रोजी रजा न उपभोगता काम केलेल्या कामाचा पगार मिळण्याबाबत दिलेल्या पत्राची माझी मुळ प्रत दाखविली. त्यावर माझी सही आहे. सदर पत्र त्यांना मिळाल्याची त्यावर पोच आहे. त्यास नि.क्र.यु–१७ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल प्र. व्यवस्थापक प्रशासन व मानव संसाधन विभाग यांनी मला दि.११.०२.२०२० रोजी वैद्यकिय रजा न उपभोगता काम करणेबाबत दिलेल्या पत्राची मुळ प्रतिवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली त्यास नि.क्र.यु–१८ देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये

दाखल सब अकॉउंटंट शाखा सिंदेवाही यांनी ३०.०६.२०२० रोजी सेवा निवृत्तीचा दाखल्याची प्रतीलिपी मध्ये मला मिळालेल्या प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली. त्यास <u>नि.क्र.यु—१९</u> देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी गैरअर्जदार यांना दि.१८.१२.२०२० रोजी मी गैरअर्जदार यांना माझे अधिवक्ता मार्फत पाठविलेल्या नोटीस ची स्थळ प्रत दाखविली. त्यास <u>नि.क्र.यु—२०</u> देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी गैरअर्जदार यांना दि.१८.१२.२०२० रोजी दिलेल्या नोटीस चे गैरअर्जदार यांनी माझे अधिवक्ता यांना दि.१०.०६.२०२१ दिलेले उत्तराची प्रत दाखविली. त्यास <u>नि.क्र.यु—२१</u> देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल गैरअर्जदार बॅक शाखा, सिंदेवाही येथील कर्मचा—यांची पगार पत्रकाची जुन २० चे विवरणाची छायांकित प्रत दाखविली. त्यावर माझे नाव क्र.१ वर नमुद असुन त्यावर माझा पगाराबाबत नोंद नमद आहे. त्यास आर्टिकल **<u>ए</u>** देण्यात येते.

<u>फेरतपास</u> — <u>काही नाही</u>

माझे समक्ष

स्वाक्षरी/—

(श्रीमती रू.वि. मेटे)

न्यायाधीश

कामगार न्यायालय, चंद्रपुर

चंद्रपुर.

दि.२९.०७.२०२२.